लेखक मानवाधिकार चळवळ
**डॉ.धनंजय खैर** (होमिओपॅथी तज्ञ) यांचे
३० वर्षाचा अनुभव असलेले कराडमधील एकमेव
**होमिओपॅथी क्लिनीक**
ऑपरेशन शिवाय नाकातील वाढलेले हाड, मुतखडा, पिताशयातील खडा, दमा यासारख्या जुनाट आजारावरील उपचारासाठी भेटा.
टिळक हायस्कुल जवळ, कराड मोबा:९३७०३३२४१३

जनसामान्यांचा बुलंद आवाज
# कर्मयोगी
Karmayogi
मोबा.9326133731 सातारा-सांगली-कोल्हापूर-सोलापूर
कराड (सातारा) वर्ष:२५ | अंक:२०२ RNI NO.MAH-MAR/2001/3806 | संपादिका:सौ.मंगल नंदकुमार लोखंडे | प्रबंध संपादक:श्री.संजय पवार | शुक्रवार दि.२४ जानेवारी २०२५ | पाने ४ | किंमत २ रूपये
Karad(Satara) Vol-25 | Ishue-202 RNI NO.MAH-MAR/2001/3806 | Editor Mrs.Mangal Nandkumar Lokhande | Friday 24 January 2025 | Pages 4 | Price 2 Rs.

## कराडजवळ भीषण आगीत गॅस पाईप लाईनचे साहित्य जळून खाक

### लाखो रुपयांचे साहित्य जळून खाक

**कर्मयोगी वृत्तसेवा**
**कराड,दि.२३**

विजेच्या ट्रान्सफार्मरवर वानराने उडी मारल्याने शॉर्ट सर्किट होऊन लागलेल्या आगीत लाखो रूपयांच्या केबल व गॅस पाईप लाईनसाठी वापरले जाणारे साहित्य जळून खाक झाले. ही घटना गोटे (ता.कराड) गावच्या हद्दीत पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गानजीक आज(गुरूवारी) दुपारी १.३० च्या सुमारास घडली.

याबाबत मिळालेली माहिती अशी, पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावरील सेवा रस्त्यावर मागील अडीच ते तीन वर्षापासून गॅस पाईप लाईन टाकण्याचे काम सुरू आहे. बीपीसीएल या कंपनीकडून हे काम सुरू असून कंपनीने पाईप लाईन टाकण्यासाठी एका ठेकेदारास ठेका दिला आहे. या ठेकेदाराने कराडजवळील गोटे गावच्या हद्दीत पुणे - बंगळूर महामार्गालगत एका जागेवर गॅस पाईप लाईनसाठी आवश्यक पाईप,



केबल, जमिनीतून गॅस पाईप लाईन नेण्यासाठी क्रॉम्प्रेसर यासह अन्य साहित्य ठेवले आहे. संबंधित ठेकेदाराला कंपनीकडून या साहित्याचा पुरवठा केला जातो. अशी चर्चा घटनास्थळी सुरू होती.

दरम्यान, आज(गुरूवारी)दुपारी १.३० च्या सुमारास याच परिसरात असलेल्या ट्रान्सफार्मरवर एका वानराने अचानकपणे उडी मारली. त्यामुळे शॉर्टसर्किट झाले. संबंधित ट्रान्सफार्मरनजीक मोठ्या प्रमाणावर केबल, गॅस पाईप तसेच अन्य साहित्य ठेवण्यात आले होते. त्याचबरोबर या परिसरात मोठ्या प्रमाणावर गवत व झाडी उगवली होती. मागील काही दिवस पडणाऱ्या कडक उन्हामुळे हे गवत व झाडी पूर्णपणे वाळली होती. त्यामुळे शॉर्ट सर्किट होताच काही क्षणातच आगीचा भडका उडाला. वाळलेले गवत व झाडीसह केबल व पाईपला प्लास्टिक कोटिंग असल्याने काही क्षणातच आगीने रौद्ररूप धारण केले होते. या आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

## नक्षलवाद्यांनी पेरलेला ५० किलो आयईडी नष्ट

**बिजापूर,दि.२३(वृत्तसंस्था)**

हल्ला करण्याच्या तयारीत असलेल्या नक्षलवाद्यांना सुरक्षा दलांनी मोठा झटका दिला आहे. छत्तीसगडमधील नक्षलग्रस्त बिजापूर जिल्ह्यात सुरक्षा दलांनी सुमारे ५० किलो इम्प्रोव्हाइज्ड एक्सप्लोसिव्ह डिव्हाईस (आयईडी) नष्ट केला आहे. पोलिस अधिकाऱ्यांनी गुरुवारी दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यातील बासागुडा-आवापल्ली रस्त्यावरील पुलाखाली हे ५० किलो आयईडी लावण्यात आला होता. यादरम्यान, गस्तीवर निघालेल्या सीआरपीएफच्या पथकाला हे स्फोटके आढळले.

सुरक्षा दलाचे पथक तिमापूर दुर्गा मंदिराजवळ असताना त्यांना नक्षलवाद्यांनी पुलाखाली सुमारे ५० किलो आयईडी पेरल्याची माहिती मिळाली. अधिकाऱ्यांनी सांगितले की, नक्षलवाद्यांनी पुलाखालील काँक्रीट काढून



त्यात हे आयईडी लपवले होते. आयईडी शोधण्यासाठी मेटल डिटेक्टरचा वापर करण्यात आला. अथक प्रयत्नानंतर हा आयईडी निकामी करण्यात आला.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, मोठ्या वाहनांना उडवण्यासाठी हे रिमोट कंट्रोल आयईडी पेरला होता. मात्र सुरक्षा दलांच्या सतर्कतेमुळे नक्षलवाद्यांचे मनसुबे उधळून लावले. हा भूसुरुंग नष्ट करताना रस्त्यावर खोल खड्डा तयार झाला होता, तो भरून वाहतूक पूर्ववत करण्यात येत आहे.

या महिन्याच्या ६ तारखेला राज्यातील विजापूर जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी सुरक्षा दलांना लक्ष्य करण्यासाठी भूसुरुंगाचा स्फोट केला होता, ज्यात ८ सुरक्षा कर्मचारी आणि वाहन चालकासह नऊ जणांना जीव गमवावा लागला. ही घटना घडवण्यासाठी माओवाद्यांनी सुमारे ७० किलो वजनाचा आयईडी वापरला होता.

## मुख्याधिकाऱ्यांविरोधात २ हजार पालकांसह मोर्चा काढणार

### माजी उपनगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव यांचा इशारा; शाळा क्रमांक तीनच्या विकासाकडे दुर्लक्ष

**कर्मयोगी वृत्तसेवा**
**कराड,दि.२३**

कराड नगरपरिषद शाळा क्रमांक तीनच्या विकासाकडे मुख्याधिकारी शंकर खंदारे हे जाणीवपूर्वक व राजकारण आणून दुर्लक्ष करत आहेत. शाळेच्या मागण्यांची सात दिवसांत पूर्तता न केल्यास शाळेच्या २ हजार विद्यार्थी, पालक व नागरिकांचा नगरपालिकेवर मोर्चा काढण्यात येणार असल्याचा इशारा यशवंत विकास आघाडी व शिवसेनेचे नेते राजेंद्रसिंह यादव यांनी दिला आहे.

याबाबतचे निवेदन राजेंद्रसिंह यादव यांनी मुख्याधिकारी शंकर खंदारे यांना दिले आहे. या निवेदनात म्हटले आहे की, कराड नगरपरिषद शाळा क्रमांक ३ ही गुणवत्ता व पटसंख्येत राज्यात अग्रेसर असून शाळेचा गुणगौरव देशपातळीवर झाला आहे. ही कराडच्या दृष्टीने अभिमानास्पद बाब आहे. मात्र सध्या या शाळेकडे मुख्याधिकारी तथा प्रशासक जाणूनबुजून दुलेक्ष करीत असल्याची बाब निदर्शनास आली आहे. यामध्ये ते राजकारण करीत असल्याची आमची खात्री झाली आहे.

शाळा क्रमांक ३ च्या रविवार पेठेतील ३ वर्ग खोल्यांचे काम गेली १८ महिने आपण मुद्दाम सुरु केले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे. शाळा रंगरंगोटी, मुताऱ्या, स्वच्छता, ड्रेनेजचे काम केले नाही. यामुळे मुलांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे.

याउलट ज्या शाळेत विद्यार्थी नाहीत, अशा शाळांना भौतिक सुविधा रंगरंगोटी करुन दिली आहे. यावरुन आपण कोणाच्या तरी सांगण्यावरुन हे सर्व करीत असल्याचे दिसून येते. शाळा क्र.३ मध्ये २ हजार विद्यार्थी शिक्षण घेतात, मात्र तेथे मुद्दाम शिक्षक न देणे. समन्वयक पदाची नेमणूक न करणे हे जाणीवपर्वक केले जात आहे.

या सर्व गोष्टीमुळे शाळेच्या गुणवत्तेवर व पटसंख्येवर परिणाम होत आहे. महाराष्ट्रातील नावाजलेल्या नगरपालिकेच्या शाळेला सहकार्य न करण्याची भुमिका चुकीची आहे. या संदर्भामध्ये वरिष्ठ पातळीवरही आम्ही तक्रार करणार आहोत. वरील सर्व बाबी ७ दिवसात पुर्ण न केल्यास आपल्या कार्यालयावर २ हजार विद्यार्थी, पालक व प्रभागातील नागरिकांचा नगरपालिकेवर मोर्चा काढण्यात येईल व या गोष्टीस सर्वस्वी तुम्ही जबाबदार राहाल, असा इशारा यशवंत विकास आघाडीचे नेते व माजी उपनगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव यांनी दिला आहे.

## राम गोपाल वर्मांना ३ महिन्यांचा तुरुंगवास

**मुंबई,दि.२३(वृत्तसंस्था)**



राम गोपाल वर्मा यांना मुंबईतील एका न्यायालयाने ३ महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे. त्याच्याविरुद्ध चेक बाऊन्स प्रकरणाची सुनावणी सात वर्षांपासून सुरू होती, ज्यासाठी आता त्याला न्यायालयाने दोषी ठरवले आहे.

दरम्यान, चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शक राम गोपाल वर्मा यांच्याबद्दल एक मोठी बातमी समोर आली आहे. वर्मांना ७ वर्षे जुन्या प्रकरणात दोषी ठरवण्यात आले असून ३ महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

पान नं. ४ वर...

## वाहतुक शाखेच्या सतर्कतेमुळे दुचाकी चोरट्यास अटक

**कर्मयोगी वृत्तसेवा**
**कराड,दि.२३**

चोरीची दुचाकी घेऊन फिरणाऱ्यास कराड शहर वाहतुक शाखेच्या पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून सांगली जिल्ह्यातून चोरलेली दुचाकी हस्तगत करण्यात आली आहे. कराडातील वाहतूक पोलिसांच्या सतर्कतेमुळे सांगली जिल्ह्यातील दुचाकी चोरीचा हा गुन्हा उघडकीस आला.



निरंजन सोमनाथ साळुंखे (वय २२,मूळ रा.मासाळ टेक, म्हसवड, ता.माण, सध्या रा.खोडशी, ता.कराड) असे पोलिसांनी ताब्यात घेतलेल्याचे नाव आहे.

पान नं. ४ वर...

## कराड अर्बन बँकेच्या थकबाकीदाराला सातारा न्यायालयाने सुनावली शिक्षा

### ६ महिने कारावास व ९ लाख ४४ हजार रुपये दंड भरपाईचा आदेश

**कर्मयोगी वृत्तसेवा**
**कराड,दि.२३**

दि कराड अर्बन को-ऑप. बँक लि. कराड बँकेचे थकबाकीदार विजय विलास दिघे (रा.२३९, दौलतनगर, शानबाग शाळेजवळ, सातारा) यांनी बँकेकडून घेतलेले कर्जाची नियमित परतफेड न केल्याने, बँकेद्वारे त्यांचे विरुद्ध कायदेशीर वसुली कारवाई कार्यान्वित करण्यात आली. सदर वसुली कारवाई दरम्यान, कर्जदार विजय विलास दिघे यांनी त्यांचे कर्जखाती भरणा करण्यासाठी रक्कम ६ लाख रुपयेचा धनादेश दिला.

सदर धनादेश बँकेमार्फत वटविण्यासाठी दिला असता, तो न वटता परत आल्याने बँकेद्वारे त्यांना चलनक्षम दस्तऐवज कायदा १८८१ मधील तरतुदीनुसार नोटीस पाठवून निर्धारित मुदतीत चेक रक्कम भरणा करणेबाबत कळविले होते. सदर नोटीस मिळून देखील दिघे यांनी चेक रक्कम भरणा न केल्याने बँकेद्वारे चलनक्षम दस्तऐवज कायदा १८८१ मधील तरतुदीनुसार मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, सातारा यांचेसमोर समरी फौजदारी केस क्रमांक १४४/२०१९ अन्वये तक्रार दाखल करण्यात आली होती.

सदर केसच्या सुनावणी होऊन मे. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सातारा यांनी थकबाकीदार तथा आरोपी विजय विलास दिघे यांना याप्रकरणी दोषी मानून ६ महिने तुरुंगवास व सदरकामी एका महिन्याचे आत दंड रक्कम ९ लाख ४० हजार भरण्याची शिक्षा सुनावली. याउपर, आरोपी विजय दिघे यांनी नमूद दंडाची रक्कम मुदतीत न भरल्यास, त्यांना पुढील १ महिना वाढीव तुरुंगवास देणेचे निर्देश मे.कोर्टाने दिले आहेत.

बँकेचे वसुली अधिकारी, वसुलीकामी थकबाकीदार यांच्याकडे गेल्यानंतर, थकबाकीदार यांच्यामार्फत बँकेची वसुली कारवाई रखडविण्यासाठी धनादेश / चेक बँकेकडे सुपूर्त केले जातात. मात्र मे. कोर्टाच्या या निर्णयामुळे बँकांचे तथा वित्तीय संस्थांचे कर्ज बुडवू पाहणाऱ्या थकबाकीदारांना चांगलाच चाप बसणार आहे.

या खटल्या प्रकरणी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सीए दिलीप गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेच्या सातारा रिजन व मुख्य कार्यालयातील वसुली आणि कायदा विभागामार्फत सातत्यपूर्ण पाठपुरावा करण्यात आला होता. सदर खटल्यामध्ये बँकेच्यावतीने अ‍ॅड. जे. बी. यादव यांनी काम पाहिले.

### हवामानाचा अंदाज

| ठिकाण | किमान | कमाल |
|---|---|---|
| सातारा | २२ | २१ |
| सांगली | २१ | १९ |
| कोल्हापूर | २० | १९ |
| पंढरपूर | २० | २० |
| सोलापूर | २२ | २१ |

### चिमटा.ऽ..ऽ...ऽ




## ‘कृष्णा’ला सर्वोत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापनासाठी राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

### खा.शरद पवार यांच्या हस्ते व उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार प्रदान

**कर्मयोगी वृत्तसेवा**
**कराड,दि.२३**

रेठरे बुद्रुक (ता.कराड) येथील य.मो.कृष्णा सहकारी साखर कारखान्यास पुणे येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्यावतीने दक्षिण महाराष्ट्र विभागातील सन २०२२-२३ या गळीत हंगामासाठी सर्वोत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापनासाठीचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार माजी केंद्रीय मंत्री खा. शरद पवार यांच्या हस्ते व उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला. विनायक भोसले यांच्यासह संचालक मंडळाने हा पुरस्कार स्वीकारला.

याप्रसंगी सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील, सार्वजनिक बांधकाममंत्री ना.शिवेंद्रसिंहराजे भोसले, व्हीएसआयचे उपाध्यक्ष दिलीप वळसे-पाटील, आमदार जयंत पाटील, राष्ट्रीय साखर संघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, विजयसिंह मोहिते-पाटील, माजी सहकार मंत्री बाळासाहेब पाटील, माजी मंत्री राजेश टोपे, माजी सहकार राज्यमंत्री आमदार डॉ. विश्वजीत कदम, खा. विशाल पाटील, महाराष्ट्र राज्य साखर संघाचे अध्यक्ष पी.आर.पाटील, जयप्रकाश दांडेगावकर, व्हीएसआयचे सल्लागार शिवाजीराव देशमुख, महासंचालक संभाजी कडू-पाटील यांची प्रमुख उपस्थिती होते.

गेली १० वर्षे चेअरमन डॉ. सुरेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली कृष्णा कारखाना उत्कृष्ट वाटचाल करत आहे. कृष्णा कारखान्याने सन २०२२-२३ या गळीत हंगामात एकूण उत्पादन प्रक्रियेचा खर्च (६००.२० रुपये प्रति क्विंटल) हा राज्याच्या सरासरी साखरेच्या एकूण उत्पादन प्रक्रियेच्या खर्चापेक्षा (८०५.०४ रुपये प्रति क्विंटल) कमी ठेवत, उत्कृष्ट नफा निर्देशांक राखला आहे. तसेच कारखान्यातील साखरेचा प्रति क्विंटल रोखीचा उत्पादन प्रक्रिया खर्च (४४६.७९ रुपये प्रति क्विंटल) हा राज्याच्या सरासरी प्रति क्विंटल रोखीच्या उत्पादन प्रक्रिया खर्चापेक्षा (५४१.९२ रुपये प्रति क्विंटल) कमी आहे. याशिवाय खेळत्या भांडवलावरील व्याजाचा खर्चदेखील (८३.१० रुपये प्रति क्विंटल) हा राज्याच्या सरासरी साखरेच्या प्रति क्विंटल खेळत्या भांडवलावरील व्याजाच्या खर्चापेक्षा (१०९.८० रुपये प्रति क्विंटल) कमी राखत, सर्वोत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापन केले आहे.



**पुणे : माजी केंद्रीय कृषीमंत्री खा.शरद पवार यांच्या हस्ते व उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्वोत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापनासाठीचा पुरस्कार स्वीकारताना विनायक भोसले यांच्यासह संचालक मंडळ व अधिकारी.**

या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत व्ही.एस.आय.ने सर्वोत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापनासाठीचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार कृष्णा कारखान्याला प्रदान केला. यावेळी कारखान्याचे संचालक धोंडीराम जाधव, संजय पाटील, बाजीराव निकम, जे.डी.मोरे, विलास भंडारे, अविनाश खरात, वसंतराव शिंदे, श्रीरंग देसाई, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर सी.एन देशपांडे, मनोज पाटील, वैभव जाखले, फायनान्स मॅनेजर राजाराम चन्ने, चीफ अकौंटट पंडित झांझुर्णे, अकौंटट संदीप भोसले आदींची उपस्थिती होती.

## सुविचार

कष्ट ही एक अशी चावी आहे जे नशीबात नसलेल्या गोष्टींचे सुध्दा दरवाजे उघडते.

## संपादकीय

# विलक्षण अवकाश जोडणी

भारतीय अंतराळ वैज्ञानिकांनी पुन्हा एकदा देशाला अभिमान वाटेल, असा पराक्रम करून दाखविला आहे. अंतराळात सोडलेले दोन उपग्रह अंतराळातच परस्परांशी जोडले जाणे, त्यांनी त्यानंतर एकच उपकरण बनून काम करणे आणि पुढे सूचना मिळाल्यानंतर पुन्हा विलग होणे हे सर्व टप्पे वैज्ञानिकांनी यशस्वी केले आहेत. हे यश मिळविणारा भारत हा अमेरिका, रशिया, चीन यांच्यानंतरचा केवळ चौथा देश आहे. अमेरिकेने या क्षेत्रात बरेच आधी, लक्षणीय यश मिळविले असले तरी अनेक आघाड्यांवर सतत संघर्ष करून, कोंडी फोडून भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजे 'इस्त्रो'ने केलेला हा पराक्रम मुळीच कमी महत्त्वाचा नाही. किंबहुना, या विलक्षण यशामुळे भविष्यात अवकाशात होणाऱ्या संशोधनपर व इतरही मोहिमा भारताची दखल घेतल्याशिवाय पुढे जाणार नाहीत. अमेरिकेने सहा वर्षांपूर्वी 'स्पेस फोर्स'ची स्थापना केली असून त्याची जबाबदारी संरक्षण खात्याकडे दिली आहे. अमेरिकेचे वर्चस्व असणाऱ्या 'नाटो' या राष्ट्रसमूहानेही संयुक्तपणे अंतराळातील संभाव्य संघर्षांची तयारी चालविली आहे. भारतीय वैज्ञानिकांचे यश हे अंतराळ विज्ञानातील एक मोठा टप्पा म्हणून महत्त्वाचे आहेच. मात्र, या यशाला मोठे लष्करी आणि युद्धनैतिक, राजनैतिक मोल आहे; हे विसरून चालणार नाही. कोणताही देश महासत्ता बनतो; तेव्हा त्याला विविध परींचे सामर्थ्य प्राप्त होत जाते. भारताचा विचार केला तर आर्थिक ताकदीप्रमाणेच भारताने गेल्या काही दशकांत विशेषत: अंतराळविज्ञान व अणुविज्ञान या दोन आघाड्यांवर देदीप्यमान कामगिरी केली आहे. 'स्पेस डॉकिंग' म्हणजे ही 'अंतराळजोडणी' ही या वाटचालीतली मोठी झेप आहे. वैज्ञानिकांचे याबद्दल मन:पूर्वक अभिनंदन करायला हवे! पीएसलव्ही सी ६० म्हणजे ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपकाने दोन उपग्रह घेऊन ३० डिसेंबरला अवकाशात झेप घेतली. तेव्हा या अंतराळजोडणीचे वेळापत्रक ठरले होते. त्यानुसार, दोन उपग्रहांची जोडणी सात जानेवारीला होणे अपेक्षित होते. अनेक कारणांनी हा प्रयोग पुढे गेला. चौथ्या प्रयत्नात दोन्ही उपग्रह हलके हलके परस्परांच्या जवळ आले. त्यांच्या नियंत्रक आणि परिचालन यंत्रणा एकमेकींशी सुरळीत जोडल्या गेल्या आणि त्यांनी 'एकजीव' बनून काम करून दाखविले. भारताला अंतराळात स्वत:चे स्थानक उभारायचे आहे. 'भारत अंतरिक्ष स्थानक' असे त्याचे नाव असेल. ते २०३५ मध्ये किंवा आधीच सज्ज व्हावे, असे लक्ष्य आहे. ते गाठण्यात ही अंतराळजोडणी मोलाची ठरणार आहे. सध्या अंतराळात कार्यरत असणारे फुटबॉल मैदानाच्या आकाराचे स्थानक हे १६ देशांनी एकत्र येऊन उभारले आहे आणि ते अजून काहीच वर्षे काम करील. भारताला इतके मोठे स्थानक बांधायला वेळ लागेल. मात्र, आजचे यश पाहता अनेक सुटे स्व–तंत्र भाग अंतराळात पाठवून तेथे जोडणे आणि सुसज्ज अंतराळ स्थानक बांधणे; ही तंत्रवैज्ञानिक झेप आवाक्यात आली आहे. भारतीयांना दैनंदिन जीवनात पैसे पाठविणे, विमानप्रवास किंवा इतर मोजके अपवाद वगळता भारताच्या विलक्षण तंत्रवैज्ञानिक प्रगतीचा काही अंदाजच नसतो. ती एक निरक्षरताच आहे. खरे तर, भारतीय वैज्ञानिक, तंत्रज्ञ अनेक क्षेत्रांत भीमपराक्रम करीत आहेत. अवकाशात सारी गणिते जमवून दोन उपग्रह क्रमाक्रमाने निकट आणणे आणि त्यांचे मिलन घडवणे; हे बहुतेक प्रगत देशांनाही जमलेले नाही. या तंत्रवैज्ञानिक प्रगती व यशाशी भारतीय नागरिकांचे रोजचे जीवन केवळ भौतिकच नव्हे तर मानसिकरित्याही जोडले जाणे, अतिशय आवश्यक आहे. उद्या आपले अंतराळस्थानक झाल्यावर एका बाजूला अंतराळवीर धाडण्याचा क्षण जसा जवळ येईल; तसेच, भारताचे जगाच्या पटावरचे महत्त्व व ताकदही त्याने वाढेल. अंतराळस्थानकात सूक्ष्मजीवांच्या अभ्यासापासून मानवी आरोग्याचेही अनेक प्रयोग करता येतील. हवामान वा सूक्ष्म गुरुत्वाकर्षण व त्याचे परिणाम यांचा अभ्यास हेही त्यात आलेच. थोडक्यात, वैज्ञानिकांना एक मोठे यश मिळते तेव्हा त्याच्या पोटात पुढच्या अनेक यशांचे अंकुर उमलत असतात. अशा यशामागे वैज्ञानिकांची प्रयोग व कामातील शिस्त, विज्ञानावरची अढळ निष्ठा, निराश न होता आव्हानांना भिडण्याची जिद्द, कल्पक विचार व धाडसी कृती करण्याची तयारी.. असे अनेक गुण असतात. भारतीय वैज्ञानिकांनी अनेकदा हे गुण दाखवले. ही अंतराळजोडणी अशाच गुणांमुळे यशस्वी झाली. भारतीय समाजाने वैज्ञानिकांचे हे गुण आत्मसात करायला हवेत. नुसतेच टाळ्या वाजवून किंवा बाहू स्फुरण पावून भागणारे नाही!

**'कर्मयोगी'** हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक नंदकुमार ज्ञानेश्वर लोखंडे** यांनी हर्षद प्रिंटर्स अॅन्ड पब्लिशर्स,बनवडी पो.पार्ले, ता.कराड, जि.सातारा येथे छापून दैनिक कर्मयोगी कार्यालय ११६,श्रध्दा कॉम्प्लेक्स, स्टेशन रोड,बुधवार पेठ, कराड ४१५११० जि.सातारा (महाराष्ट्र) येथून प्रसिध्द केले. **संपादिका सौ.मंगल नंदकुमार लोखंडे** ***कार्यकारी संपादक – खंडू इंगळे** *पीआरबी अॅक्ट १८६७ नुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील. **RNI NO-MAHMAR/2001/3806**

**Karmayogi,** Printer, Publisher and Owner **Nandkumar Dnyaneshwar Lokhande** Printed at Harshad Printers And Publishers, Banawadi Post-Parle Tal-Karad Dist-Satara (MS) And Published at Daily Karmayogi Karyalay, 116, Shrdha Complex, Station Road, Budhawar Peth, Karad 415 110 Dist-Satara (MS) Editor **Mrs.Mangal Nandkumar Lokhande** *Exceutive Editor **Khandu Ingale** *PRB Act 1867 Editorial Responsibility **RNI NO-MAHMAR/2001/3806**

**Email - karmyogi2008@gmail.com**

**मुख्य कार्यालय:** ११६,श्रध्दा कॉम्प्लेक्स, स्टेशन रोड, बुधवार पेठ, कराड. ४१५११० (मोबा.९३२६१३३७३१) सातारा प्रतिनिधी :८४२१८२२५०० सोलापूर कार्यालय:(मोबा.९३७१८०७१४५) कोल्हापूर शहर कार्यालय–संपर्क (मोबा.९२२५८१२४२४). पंढरपूर शहर कार्यालय–संपर्क (मोबा.९०२८३४६४१५).

# वाई नगरपरिषद,वाई जि.सातारा

### महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०२५

**कलम -३ अन्वये नगरपालिका (क) वर्ग ने जाहीर करावयाचा लोकसेवेचा तपशील**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ -२०१५ /प्र.क्र.१८९/नवि -१४ दिनांक २३-०६-२०१५<br>
महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ -२०१५ /प्र.क्र.३९८/नवि -२० दिनांक ०४-०९-२०१७<br>
महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ -२०१५ /प्र.क्र.३९८/नवि -२० दिनांक २६-०८-२०१९<br>
महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ -२०१९ /प्र.क्र.१८०/नवि -२० दिनांक २९-०१-२०२१<br>
महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ -०९२२ /प्र.क्र.३२/नवि -३२ दिनांक३०-०९-२०२२<br>
महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ -०९२२ /प्र.क्र.३२/नवि -३२ दिनांक१५-१२-२०२२<br>
महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ -०९२२ /प्र.क्र.३२/नवि -३२ दिनांक ०९-०१-२०२४

| अ.क्र. | लोकसेवांची सूची | आवश्यक कागदपत्रे | फी | नियमकाल मर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | जन्म प्रमाणपत्र देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ बाळाचे आई - वडिलांचे आधारकार्ड झेरॉक्स<br>३ दवाखन्यातील जन्मखबर (असल्यास) छायाप्रत<br>४ पालका ऐवजी इतर नाते वाईक असतील तर पालकांची समत्तीपत्र | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ अन्वये प्राधिकृत अधिकारी(संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २ | मृत्यू प्रमाणपत्र देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ दवाखान्यात मृत्यू झाला असल्यास नमुना नं ४<br>३ घरी मृत्यू झाला असल्यास नमुना नं ४ अ<br>४ अर्जदार व मृतक व त्याचे नातेवाईकांचे आधारकार्ड झेरॉक्स | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ अन्वये प्राधिकृत अधिकारी(संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३ | विवाह नोंदणी प्रमाणत्र | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ वास्तव्याचा पुरावा<br>३ वयाचा पुरावा<br>४ विवाहा साठी उपस्थित साक्षीदारांचे स्वयंघोषणापत्र<br>५ ९० दिवसांनंतर नोंदणी असल्यास स्वयंघोषणापत्र | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | विवाह नोंदणी अधिनियम १९९८ अन्वये प्राधिकृत अधिकारी (संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४ | मालमत्ता कर उतारा देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ संकलित कर व पाणीपट्टी कर भरणा केलेल्या पावतीची छायांकित प्रत | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५ | थकबाकी नसल्याचा दाखला | १ विहित नमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ६ | अ) दस्त ऐवजांच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ थकबाकी नसल्याचा दाखला<br>३ दस्तऐवजाची प्रत (खरेदी खत/ बक्षीसपत्र/ वाटणीपत्र व इतर) | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| | ब) वारसा हक्काने मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ थकबाकी नसल्याचा दाखला<br>३ मा. कोर्ट आदेश, ७/१२, सिटी सर्वे उतारा व इतर यापैकी एक | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ७ | झोन दाखला दणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ ७/१२, सिटी सर्वे उतारा<br>३ मोजणी नकाशा/ सिटी सर्वे उतारा | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | सहा. नगररचनाकार | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ८ | भाग नकाशा देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ ७/१२, सिटी सर्वे उतारा<br>३ मोजणी नकाशा/ सिटी सर्वे उतारा | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | सहा. नगररचनाकार | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ९ | बांधकाम परवानगी देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ वास्तूविशारदाख दाखला<br>३ मालकी हक्काची कागदपत्रे<br>४ बांधकाम आराखडा नकाशा ५ प्रती<br>५ मोजणी नकाशा<br>६ मंजूर रेखांकनाची प्रत | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ६० दिवस | सहा. नगररचनाकार | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १० | जात प्रमाणपत्र | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | सहा. नगररचनाकार | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ११ | भोगवटदार प्रमाणपत्र देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र<br>३ जोते प्रमाणपत्र<br>४ घर मालक/ वास्तूविशारद यांचे पुर्णत्वाचे स्वयंघोषणापत्र | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | सहा. नगररचनाकार | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १२ | नळ जोडणी देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ जागा मालकी कागदपत्रे<br>३ थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | सहा. नगररचनाकार | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १३ | जल निस्सारण जोडणी देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ जागा मालकी कागदपत्रे<br>३ थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | पाणी पुरवठा विभाग प्रमुख | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १४ | नव्याने कर आकारणी | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | पाणी पुरवठा विभाग प्रमुख | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १५ | पुन:कर आकारणी | १ विहित नमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १६ | कराची मागणी पत्र तयार करणे | १ विहित नमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १७ | कर माफी मिळणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १८ | रहिवासी नसलेल्या मालमत्तांना करात सुट मिळणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १९ | मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे/ इतर मार्गाने | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ थकबाकी नसल्याचा दाखला<br>३ मालकी हक्काची कागदपत्रे/ नोंदणीकृत, खरेदीखत | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २० | स्वयंमुल्यांकन | १ विहित नमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |

| अ.क्र. | लोकसेवांची सूची | आवश्यक कागदपत्रे | फी | नियमकाल मर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| २१ | अआक्षेप नोंदविणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २२ | उपविभागामध्ये मालमत्ता विभाजन | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ थकबाकी नसल्याचा दाखला<br>३ मालकी हक्काची कागदपत्रे/ नोंदणीकृत, वाटणीपत्र, बक्षीसपत्र इ. | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २३ | मालमत्ता पाडणे व पु: बांधणी कर आकारणी | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २४ | नवीन नळ जोडणी | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २५ | मालकी हक्कात बदल करणे | १ मालकी हक्क कागदपत्रे<br>२ थकबाकी नसल्याचा दाखला<br>३ मालकी हक्क कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २६ | नळ जोडणी आकारामध्ये बदल करणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ मालकी हक्क कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २७ | तात्पुरते/ कायम स्वरूपी नळ जोडणी खंडीत करणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २८ | पुन: जोडणी करणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २९ | वापरामध्ये बदल करणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३० | पाणी देयक तयार करणे | १ आवश्यकतेनुसार वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३१ | प्लंबर परवाना | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ शैक्षणिक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र<br>३ थकबाकी नसल्याचा दाखला<br>४ स्वयंघोषणापत्र | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३२ | प्लंबर परवाना नुतनीकरण करणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ शैक्षणिक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र<br>३ थकबाकी नसल्याचा दाखला<br>४ मागील परवान्याची प्रत | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३३ | थकबाकी नसल्याचा दाखला | १ विहित नमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३४ | नादुरुस्त मीटर तक्रार करणे | १ विहित नमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३५ | अनाधिकृत नळ जोडणी प्रकार | १ विहित नमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३६ | पाण्याची दबाव क्षमता तक्रार | १ विहित नमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३७ | पाण्याची गुणवत्ता तक्रार | १ विहित नमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३८ | व्यापार/ व्यवसाय/ साठा करणेसाठी नाहरकत प्रमाणपत्र | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३९ | मंडपासाठी नाहरकत प्रमाणपत्र | १ योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२ थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४० | नवीन परवाना मिळणे | १ रस्ता पुन:स्थापन करार<br>२ योग्य प्रकारे भरलेले अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४१ | परवान्याचे नुतनीकरण | १ कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र<br>२ योग्य प्रकारे भरलेले अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४२ | परवाना हस्तांतरण | १ कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र<br>२ योग्य प्रकारे भरलेले अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४३ | परवाना दुय्यम प्रत | १ कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र<br>२ योग्य प्रकारे भरलेले अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४४ | व्यवसायाचे नाव बदलणे | १ कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र<br>२ योग्य प्रकारे भरलेले अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४५ | व्यवसाय बदलणे | १ कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र<br>२ योग्य प्रकारे भरलेले अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४६ | परवाना/ धारक भागीदाराचे नाव बदलणे | १ कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र<br>२ योग्य प्रकारे भरलेले अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४७ | भागीदाराच्या संख्येत बदल (वाढ/ कमी) | १ कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र<br>२ योग्य प्रकारे भरलेले अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४८ | परवाना रद्द करणे | १ योग्य प्रकारे भरलेले अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४९ | कालबाह्य परवानासाठी नुतनीकरण सूचना | १ योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२ कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५० | जाहिरात परवाना/ आकार चिन्ह परवाना (Signange License) नवीन परवाना | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५१ | सिनेमा चित्रीकरण परवाना (Movie Shooting License) | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५२ | व्यवसाय परवाना सयंनुतनीकरण (Auto Renewal of Trad License) | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |

# विद्यार्थ्यांच्या वाढदिवसाला पुस्तक भेट उपक्रम स्तुत्य:दिपक पवार

## दक्षिण तांबवे शाळेत वाढदिवसानिमित्त पुस्तक भेट उपक्रम



**दक्षिण तांबवे:जिल्हा परिषद शाळेस वाढदिवसानिमित्त पुस्तक भेट देताना दिपक पवार, गजानन देशमुख, आबासो साठे, मनिषा साठे, सीमा देसाई आदी**

**कर्मयोगी वृत्तसेवा**
**कराड,दि.२३**

मोबाईल, टीव्ही या मनोरंजनच्या साहित्यामुळे आजची पिढी, विद्यार्थी वाचनापासून दूर जात आहे. मुलांच्यात वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी वाढदिवसाला पुस्तक भेट देणे हा दक्षिण तांबवे शाळेचा उपक्रम स्तुत्य असल्याचे प्रतिपादन वडगाव हवेली कन्या शाळेचे मुख्याध्यापक दिपक पवार यांनी केले.

दक्षिण तांबवे (ता.कराड) येथील जिल्हा परिषद शाळेत ज्ञानेश्वरी विशाल पाटील हिच्या वाढदिवसानिमित्त शाळेस पुस्तक भेट देण्यात आली. यावेळी यशवंत संस्थेच्या माध्यमिक विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक गजानन देशमुख, मुख्याध्यापक आबासो साठे, सतीश सोनवणे, मनीषा साठे, सीमा देसाई, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिनेश मोगरे, पत्रकार विशाल पाटील यांच्यासह विद्यार्थी- विद्यार्थिनी उपस्थित होते.

आबासो साठे म्हणाले, विद्यार्थ्याला वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यासाठी त्यांनी नवनवीन पुस्तके घ्यावीत. आपण शाळेत गेल्यानंतर किमान त्यांना पुस्तकाची नावे माहीत होऊन एखादं तरी त्याने पुस्तक वाचावे. यासाठी आम्ही वाढदिवसाला शाळेस पुस्तक भेट असा उपक्रम राबवला असून पालकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे.

# सातारा येथे बीगॉसचा महा कर्ज विनिमय मेळावा




**कर्मयोगी वृत्तसेवा**
**सातारा,दि.२३**

साताऱ्यातील रहिवाशांना इलेक्ट्रिक वाहने अधिक सुलभ आणि परवडणाऱ्या दरांत उपलब्ध करून देण्यासाठी आरआर ग्लोबलच्या प्रवर्तकांपैकी बीगॉसतर्फे महा कर्ज विनिमय मेळावा आयोजित करण्यात आला.

सातारा शहरातील नगरपालिकेसमोरील केसरकर पेठेतील राम ऑटो येथे हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमाबद्दल उत्साह व्यक्त करत बीगॉसचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक हेमंत काबरा म्हणाले, ''साताऱ्यातील रहिवाशांना स्मार्ट आणि अधिक पर्यावरणपूरक वाहतुकीच्या पद्धतींकडे वळण्यासाठी एक उत्तम संधी प्रदान करता यावी म्हणून हा महा कर्ज विनिमय मेळावा आयोजित करण्यात आला होता. आकर्षक विनिमय मूल्ये आणि विशेष प्रजासत्ताक दिन सवलतींसह, आम्ही ग्राहकांसाठी इलेक्ट्रिक मोबिलिटीला व्यवहार्य आणि आकर्षक पर्याय देत आहोत.

महा कर्ज विनिमय मेळावा त्यांच्या अत्याधुनिक इलेक्ट्रिक स्कूटरमध्ये अपग्रेड करण्याची प्रक्रिया सुलभ करून शाश्वत वाहतुकीला प्रोत्साहन देण्याच्या बीगॉस च्या वचनबद्धतेवर भर देतो. ऑफरमध्ये, आरयूव्ही३५० आणि सी१२ आय ईव्ही स्कूटर त्यांच्या टिकाऊपणा, प्रगत तंत्रज्ञान आणि किफायतशीरतेसाठी वेगळे आहेत.

बीगॉसच्या ताफ्यात आरयूव्ही३५० आणि सी१२ आय इलेक्ट्रिक वाहने, ब्रँडच्या नावीन्यपूर्ण आणि पर्यावरणीय जबाबदारीच्या प्रतिबद्धतेचे उदाहरण देतात.

**बीगॉस आरयूव्ही३५०:** एका चार्जवर १४५ किमी पर्यंत प्रभावी रेंज देणारी एक प्रीमियम इलेक्ट्रिक वाहन, १६ इंच अलॉय व्हील्स, अतुलनीय प्रवेगासाठी १६५एनएम पीक टॉर्क आणि त्याची आकर्षक मेटल बॉडी, व्हायब्रंट टीएफटी स्क्रीन आणि प्रगत नेव्हिगेशन सिस्टम सारख्या स्मार्ट वैशिष्ट्यांमुळे स्टाईल आणि कार्यक्षमता दोन्ही मिळते, तर सीमलेस कनेक्टिव्हिटी स्मार्ट, आधुनिक राइड सुनिश्चित करते. आरयूव्ही३५० ची शून्य-उत्सर्जन डिझाइन ही परिपूर्ण कुटुंब-अनुकूल स्कूटर आहे. प्रत्येक राइडसह पर्यावरण पुरक भविष्य घडवते.

**बीगॉस सी१२ आय:** शहरी प्रवासासाठी परिपूर्ण एक स्टायलिश इलेक्ट्रिक स्कूटर, १३५ किमी पर्यंतची रेंज, आरामदायी राइडिंग एर्गोनॉमिक्स, ७६५ मिमी लांब सीट. कार्यक्षमता आणि सुंदरतेसाठी डिझाइन केलेले, सी१२ आय शाश्वत शहरी राइडसाठी एक खरा साथीदार.

# नांदगावात आजपासून विविध स्पर्धांचे आयोजन

**कर्मयोगी वृत्तसेवा**
**कराड,दि.२३**

नांदगाव (ता.कराड) येथे कै.सौ.द्वारकाबाई तुकाराम सुकरे यांची ४० वी पुण्यतिथी होत आहे. त्यानिमित्ताने २४ ते २६ जानेवारी दरम्यान विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ग्रामपंचायत सदस्य इंजि.प्रशांत सुकरे यांनी दिली.

कै.सौ.द्वारकाबाई सुकरे प्रतिष्ठान च्या वतीने पुण्यतिथीच्या निमित्ताने प्रत्येक वर्षी विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. यावर्षीही शुक्रवारी दि.२४ रोजी खुल्या गटातील निबंध स्पर्धा आयोजित केलेल्या आहेत. शनिवारी दि.२५ रोजी शिशू,लहान, मोठा व खुल्या गटातील वक्तृत्व स्पर्धा होणार आहेत.तर रविवारी दि.२६ रोजी सकाळी काव्यवाचन स्पर्धा व काव्यसंमेलन होणार असून दुपारी ३ वाजता बक्षीस वितरण करण्यात येणार आहे.

न्यू इंग्लिश स्कूल व कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात होणाऱ्या या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन रविंद्र सुकरे यांनी केले आहे.

| अ.क्र. | लोकसेवांची सूची | आवश्यक कागदपत्रे | फी | नियमकाल मर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| ५३ | मोबाईल टॉवर परवाना (Mobile Tower Apporoval) (Ground Base Tower Root top Tower) | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी दिलेला परवाना<br>३ संबंधित इमारतीच्या मालकी हक्काचा पुरावा<br>४ विद्य भाडेकरारनामा<br>५ स्थळाचा नकाशा (१:१०००)<br>६ ज्या इमारतींवर टॉवर उभारायचा आहे त्याचे वैद्य भागवटा प्रमाणपत्र<br>७ संबंधित इमारतीच्या /जमिनीच्या मालकाचे ना-हरकत प्रमाणपत्र<br>८ सक्षम प्राधिकाऱ्याच्या संरचनात्मक स्थिरता प्रमाणपत्र<br>९ सक्षम प्राधिकाऱ्याचा संरचनात्मक स्थिरता प्रमाणपत्र<br>* पर्यावरण विभागाची ना-हरकत संबंधित नागरी स्थानिक<br>* स्वराजय संस्थेचे ना-देय प्रमाणपत्र शासन वेळोवेळी निश्चित करेल असे इतर आवश्यक परवान/ दस्ताऐवज | शासनाने विहित केलेले व नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ६० दिवस | सहा.नगररचनाकार | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५४ | रस्ता खोदाई परवानगी देणे (To grant road cutting permission) नवीन परवाना व नुतनीकरण | १ विहित नमुन्यातील अर्ज्<br>२ कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र<br>३ शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | नगरअभियंता (स्थापत्य) | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५५ | राज्याच्या खाद्य परवान्याकरिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र देणे (To issue NOC from Municipaltyor other Local Body for state License for Food Business) | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र<br>३ ज्या इमारतीत सदर आस्थापना/ कारखाना होणार आहे.त्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र आणि सदरच्या मालकी हक्काबाबतची कागदपत्रे<br>४ शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | स्वच्छता निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५६ | खाद्य नोंदणी प्रमाणपत्राकरीता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे आरोग्य विषयक ना-हरकत प्रमाणपत्र देणे (To issue NOC from Municipality/ Panchayat for Food Registration Certificate) | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र<br>३ ज्या इमारतीत सदर आस्थापना/ कारखाना होणार आहे त्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र आणि सदरच्या मालकी हक्काबाबतची कागदपत्रे<br>४ शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | स्वच्छता निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५७ | पाणी उपसा करणेसाठी केंद्रीय भूजल सर्वेक्षण विभाग (अथवा इतर संबंधित विभाग) यांचे ना-हरकत प्रमाणपत्राकरीता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे पाणी अनुपालनब्धता प्रमाणपत्र देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र<br>३ ना-हरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्र घेणेबाबतचे च पर्जन्य जल पुनर्भरण करणेबाबतचे प्रतिज्ञापत्र<br>४ शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | पाणीपुरवठा अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५८ | लॉजिंग हाऊस परवाना देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ शासनद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | मुख्याधिकारी | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५९ | लॉजिंग हाऊस परवान्याचे नुतनीकरण करणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | मुख्याधिकारी | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ६० | मंगल कार्यालय/ सभागृह वैगेरे परवाना देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | शासनाचे सूचनानुसार स्थानिक स्तरावर निश्चित केलेल शुल्क | ३० दिवस | मुख्याधिकारी | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ६१ | मंगल कार्यालय/ सभागृह वैगेरे परवान्याचे नुतनीकरण करणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | शासनाचे सूचनानुसार स्थानिक स्तरावर निश्चित केलेल शुल्क | ३० दिवस | मुख्याधिकारी | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ६२ | फेरीवाले नोंदणी प्रमाणपत्र देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | शासनाचे सूचनानुसार स्थानिक स्तरावर निश्चित केलेल शुल्क | १५ दिवस | मुख्याधिकारी | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ६३ | भूमिगत दूरसंचार वाहिनी (ऑप्टीकल फायबर केबल) टाकण्याकरीता परवानगी देणे (Permission for establishment of undcrground cable infrastructure (Optical Fiber Cable) | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०११/ सी.आर. २४२/ UD-20 दिनांक १९/१२/२०२२ मधील Sehedule III नुसार आवश्यक कागदपत्रे<br>३ शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरविकासविभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण - २०११/ सी.आर.२४२/UD-20 दिनाक १९/१२/ २०२२ मधील तरतुदीनुसार ६० दिवस | १५ दिवस | मुख्याधिकारी | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ६४ | महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन अधिनियम १९७५ मधील कलम ८ मधील तरतुदीनुसार वृक्षतोड परवानगी देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | स्थानिक स्तरावर विहित पध्दतीने मंजूर केलेले शुल्क | ४५ दिवस | संबंधित प्राधिकरणाचे वृक्ष अधिकारी | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ६५ | रस्त्यावरील खड्डे बुजविणे | १ पुराव्यासह अर्ज उदा. Geo Tag केलेले फोटो इत्यादी. | स्थानिक स्तरावर विहित पध्दतीने मंजूर केलेले शुल्क | ५ दिवस | नगरअभियंता (स्थापत्य) | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ६६ | गटरावरील झाकणे सुस्थितीत ठेवणे | १ पुराव्यासह अर्ज उदा. Geo Tag केलेले फोटो इत्यादी. | स्थानिक स्तरावर विहित पध्दतीने मंजूर केलेले शुल्क | ५ दिवस | पाणी पुरवठा, जलनिस्सारण व आरोग्य अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ६७ | शहरात स्वच्छता ठेवणे | १ पुराव्यासह अर्ज उदा. Geo Tag केलेले फोटो इत्यादी. | स्थानिक स्तरावर विहित पध्दतीने मंजूर केलेले शुल्क | १ दिवस | पाणी पुरवठा, जलनिस्सारण व आरोग्य अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |

शिक्का

सही/-
(संजीवनी दळवी)
मुख्याधिकारी
वाई नगरपरिषद,वाई

पान नं.१ वरून...

## वाहतुक शाखेच्या सतर्कतेमुळे...

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहिती अशी, कराडच्या वाहतूक शाखेतील पोलीस उपनिरीक्षक संतोष जगदाळे व कर्मचारी ओंकार शिंदे हे बुधवारी दुपारी बसस्थानक परिसरात कर्तव्य बजावत असताना एक दुचाकी त्यांनी अडवली. संबंधित दुचाकीला नंबरप्लेट नव्हती. त्यामुळे त्यांनी चालक निरंजन साळुंखे याच्याकडे दुचाकीच्या कागदपत्राबाबत विचारणा केली. त्यावेळी त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. संशय आल्यामुळे वाहतूक पोलिसांनी ती दुचाकी ताब्यात घेतली. तसेच चालक निरंजन साळुंखे यालाही ताब्यात घेण्यात आले.

पोलीस उपअधिक्षक अमोल ठाकूर व वाहतूक शाखेचे प्रभारी सहाय्यक निरीक्षक संदीप सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी दुचाकीच्या चेसी व इंजिन क्रमांकावरून परिवहन कार्यालयाकडून माहिती घेतली असता संबंधित दुचाकी भिलवडी स्टेशन येथील संतोष गाडे यांच्या मालकीची असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी त्यांच्याकडून माहिती घेतली असता ती दुचाकी मे २०२४ मध्ये चोरीस गेली असून भिलवडी पोलीस ठाण्यात याबाबत गुन्हा दाखल असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या संशयिताला दुचाकीसह भिलवडी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

## राम गोपाल वर्मांना ३ महिन्यांचा...

सुनावणीदरम्यान हजर न राहिल्याबद्दल न्यायालयाने चेक बाऊन्स प्रकरणात राम गोपाल वर्मा यांच्याविरुद्ध नॉन वॉरंट जारी केले आहे. न्यायालयाचा हा निर्णय त्यांच्या 'सिंडिकेट' या नवीन प्रकल्पाच्या घोषणेपूर्वी आला आहे. राम गोपाल वर्मा यांना मुंबईतील एका न्यायालयाने ३ महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे. त्यांच्याविरुद्ध चेक बाऊन्स प्रकरणाची सुनावणी सात वर्षांपासून सुरू होती, ज्यासाठी आता त्याला न्यायालयाने दोषी ठरवले आहे.

टीओआयच्या वृत्तानुसार, न्यायालयाने राम गोपाल वर्मा यांना निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स कायद्याच्या कलम १३८ अंतर्गत आरोपी म्हणून मानले आहे. या प्रकरणात, न्यायालयाने राम गोपाल यांच्याकडून तक्रारदाराला ३.७२ लाख रुपये भरपाई देण्याचे आदेशही दिले आहेत. या सगळ्या प्रकरणामुळे चित्रपटनिर्माते आणि दिग्दर्शक राम गोपाल वर्मा पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत.

## कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाने ऊस उत्पादनात वाढ:शरद पवार

**पुणे,दि.२३(वृत्तसंस्था)**

उसाच्या शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा (एआय) वापर होत असून यामुळे उसाचे उत्पन्न वाढविता येणे शक्य आहे. हे लक्षात घेऊन वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या वतीने यासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक असणारे संशोधन सुरू असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी सांगितली.

वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. या कार्यक्रमात विविध पुरस्कार प्रदान करण्यात आले. उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष आणि माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, बाळासाहेब पाटील तसेच संस्थेचे महासंचालक संभाजी कडू पाटील, सल्लागार शिवाजीराव देशमुख आदी व्यासपीठावर होते.

## तारळी प्रकल्पग्रस्त मारुती जाधव यांचे प्रजासत्ताकदिनी उपोषण

**कर्मयोगी वृत्तसेवा**
**कराड,दि.२३**

ग्रामपंचायत आदर्शनगर डुदेवाडी-शिरगाव (ता.कराड) या ठिकाणी तारळी गावच्या लोकांचे पुनर्वसन करून त्या ठिकाणी घर जागा दिलेली आहे. अशाच प्रकारे प्रकल्पग्रस्त शेतकरी मारुती पांडुरंग जाधव यांना घर जागा आदर्शनगर (ता.कराड) या ठिकाणी दिलेली आहे. सदरची जागा मोजून मापून कब्जात दिलेली होती. या जागेत कंपाउंड देखील केलेले आहे, मात्र आदर्शनगर ग्रामपंचायतचे उपसरपंच किरण जाधव, सरपंच सौ.बकुळा निकम, त्यांचे पती भाऊसाहेब निकम व काही राजकारणी मुद्दामहुन त्रास देत आहेत. हेतूपूर्वक घर बांधून देत नसल्याची तक्रार, प्रकल्पग्रस्त मारुती जाधव यांनी दिली आहे.

सदर बाबतीत तात्काळ परवाना मिळून घर बांधकामास तसा परवाना मिळावा, दोषीविरुद्ध कारवाई व्हावी अशी मागणी मारुती जाधव यांची असून, याबाबतीत मारुती जाधव यांनी वेळोवेळी शासन, प्रशासनास कळवलेले आहे, ग्रामपंचायत सदस्य व राजकीय पुढारी खूप मोठ्या प्रमाणात त्रास देत आहेत,' कायद्याने कोणासही अन्न, वस्त्र, निवारा, पाण्यापासून वंचित ठेवता येत नसताना देखील मला का वंचित ठेवले जात आहे? मला का घर बांधून दिले जात नाही? अशी तक्रार जाधव यांची असून आपणास तात्काळ न्याय न मिळाल्यास आपण भारतीय प्रजासत्ताक दिन २६, जानेवारी २०२५ रोजी पासून सातारा जिल्हाधिकारी कार्यालय समोरच कुटुंबियासह उपोषणास बसणार असल्याचा इशारा मारुती जाधव (रा.मुरुड,ता.पाटण) यांनी दिला आहे.

## केमिस्ट असोसिएशनच्यावतीने आज महारक्तदान शिबीर

**कर्मयोगी वृत्तसेवा**
**पुसेसावळी,दि.२३**

अखिल भारतीय व महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष आ.जगन्नाथराव (आप्पा) शिंदे यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त शुक्रवार ता.२४ जानेवारी रोजी संपुर्ण देशात एकाच दिवशी महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असुन या माध्यमातून पंचाहत्तर हजार रक्त बॉटल संकलनाचे उद्दिष्ट ठेवले असुन सातारा जिल्हा केमिस्ट असोसिएशनेही संपुर्ण जिल्हात सातारा, कोरेगाव, रहिमतपूर, वाठार, वाई,भुईंज, खंडाळा, शिरवळ, लोणंद, फलटण, दहिवडी, म्हसवड, पुसेगाव, वडुज, मायणी, मेढा, पाटण, तळमावले, कराड, उंब्रज, पुसेसावळी याठिकाणी स.८ते ६ वाजेपर्यंत महारक्तदान शिबिराचे आयोजन केले असुन रक्तदान हे केवळ सर्वोत्तम दान नाही तर रक्तदान म्हणजे जीवनदान करण्यासारखे आहे कारण, आपण केलेल्या रक्तदानामुळे कोणाचा तरी जीव वाचू शकतो तरी जिल्हातील सर्व केमिस्ट, फार्मासिस्ट, नागरिक, युवक, महिलावर्गाने या महारक्तदान शिबिरात सहभाग घेवुन रक्तदान करावे असे आवाहन सातारा जिल्हा केमिस्ट असोसिएशन अध्यक्ष सागर पाटील यांनी केले आहे.